# न्या. मू. रानडे ह्यांचीं धर्मपर व्याख्यानें

संकलन

**रमाबाई रानडे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**न्या. मू. रानडे ह्यांचीं धर्मपर व्याख्यानें**
संकलन - रमाबाई रानडे

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**संकलन**
रमाबाई रानडे

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४००/-

# अनुक्रमणिका

## प्रस्तावना


उपोद्घात .................................................. ७
न्या. मू. रानडे यांच्या शिकवणीचें स्वरूप ......................... १०
महादेव गोविंद रानडे ............................................... १८


## भागवतधर्म


व्याख्यान पहिलें - योगमार्ग व भक्तिमार्ग.......................... ७३
व्याख्यान दुसरें - ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग............................ ७७
व्याख्यान तिसरें - कर्ममार्ग व भक्तिमार्ग........................... ८४
व्याख्यान चौथे- भक्तिमार्गाची सुलभता............................ ९१
व्याख्यान पांचवें- भागवतधर्माचें लक्षण ........................... ९८
व्याख्यान सहावें - भक्तिमार्गातील समाधि.......................... १०३
व्याख्यान सातवें - भक्तिमार्गाचें साधन............................. १०७
व्याख्यान आठवें - सुख हें साध्य नव्हे ............................ १०९
व्याख्यान नववें - भागवतधर्माचें रहस्य ............................ ११३

सनातन आर्यधर्माचीं लक्षणें ......................................... ११९
अवघे देखें जन ब्रह्मरूप............................................ १२३
विज्ञान ............................................................... १२८
भक्तिव्यवसायांत वेठ असतां नये .................................... १३२
आपलें संचित नावडेसें होणें ........................................ १३७
देवाजवळ मोक्षाचें गाठोडें नाहीं ..................................... १४२
स्वर्ग आणि नरक .................................................. १४८
सिद्ध, साध्य व साधक ............................................ १५४
देवावर भार घालून प्रपंच करणें .................................... १६१
भक्तिमार्ग पंगुणाचा आहे काय?.................................... १६५

ब्रह्मरसाच्या प्राप्तीची वास्तविक महती ............................ १६८
चित्तशुद्धीसंबंधी विचार ............................................ १७२
विवेकासहित वैराग्य पाहिजे ........................................ १८१
ईश्वराचें व धर्माचें सौम्य व उग्र स्वरूप ............................ १८५
परकृति कशी पहावी?............................................. १८९
पंढरीची यात्रा ................................................... १९३
आपल्या लोकांचा धर्मसंशोधनाकडील कल ....................... १९८
धर्मानुशासन...................................................... २०३
आत्मनस्तु कामाय सर्व प्रियं भवति ................................ २१०
माझ्या हातून पुण्याचरण कां घडत नाहीं? पाप कां घडतें?......... २१४
मामेव विजानीह्येतदेवाहं मनुष्याय हिततमं मन्ये ..................... २१९
आत्मा परमात्म्याचा एक रश्मि आहे............................... २२३
सृष्टि, जीवात्मा व परमात्मा ह्यांचा संबंध-पिंडीं तें ब्रह्मांडीं.......... २२६
स्थितप्रज्ञ कोणास म्हणावें?........................................ २२९
उन्नत धर्मविचारांचा होत असलेला प्रसार .......................... २३३
शुद्ध धर्मप्रसारक संस्थांची एकजूट ................................. २३७
आपल्या लोकांमध्यें धर्मविचार निद्रित झाला आहे काय?......... २४२
लूथरचा काळ व सध्यांचा काळ यांची तुलना .................... २५१
प्रार्थनासमाजाची आवश्यकता काय आहे?......................... २५६
खिस्तीधर्म व हिंदुधर्म .............................................. २६०
ज्ञानेश्वर ............................................................ २६४
रामदास ............................................................ २६९
एकनाथ............................................................ २७५
सुधारकांचे चार वर्ग ................................................ २८४
राजा राममोहन राय ................................................ २९०
प. वा. वामन आबाजी मोडक ..................................... ३०५
भागवतधर्ममीसांसा .................................................. ३१०
युगप्रभाव .......................................................... ३३१

✦✦✦

# *पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना*

या धर्मपर व्याख्यानांचा संग्रह करण्याचा हेतु, त्या परम पूज्य, अत्यंत शुद्ध पायांची सेवा प्रत्यक्ष नाहीं, तर या रूपानें तरी घडावी हा आहे.

मुंबईस प्रार्थनामंदिरांत उपासना चालविण्याचे जेव्हां जेव्हां प्रसंग येत, त्या वेळीं एकदां त्या प्रेममय रसाळ वाणीचा ओघ सुरू झाला कीं, हृदय उचंबळून यावें, मन तल्लीन व्हावें, क्षणांत प्रापंचिक दु:खांचा विसर पडावा, आशा व आस्था यांचा हृदयांत प्रवेश व्हावा; इतकेंच नाहीं, तर आपण कधीं कधीं साक्षात् स्वर्गसुखच अनुभवीत आहों असें वाटावें, हा प्रकार उपासना सुरू झाल्यापासून तों ती संपेपर्यंत चालत असे. एवढेंच नव्हे, तर तेथून घरीं आल्यावर सुद्धां, त्या प्रेमळ, पण मनावर पूर्णपणें संस्कार करणाऱ्या शब्दांनी जागृत केलेले धर्मविचार पुढें एकसारखे तासांचेतास मनांत घोळत राहात; व आपल्याला आज काही जास्त अधिकार प्राप्त झाला आहे, आपली योग्यता जास्त झाली आहे असें वाटून आनंद होई.

ती प्रेमळ, शांत व गंभीर वाणी प्रत्यक्ष ऐकण्याचें जरी आतां माझे भाग्य राहिलें नाहीं, तरी पण माझ्या हृदयस्थ असलेल्या मूर्तींच्या मुखांतून निघालेल्या अमृतवाणीच्या–त्या पवित्र गंगेचा–आश्रय केला, तर अशा दु:खांतही कांहीं समाधानाला जागा होईल व मनाला स्थैर्य व शांति येण्याला तीच प्रसादवाणी सर्वांशीं कारणीभूत होईल, असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. आपल्याला नंदादीप लावण्याचें सामर्थ्य नसेल, तर तेवत असलेल्या नंदादीपाची नुसती वात सारली, तरी पुण्य घडतें, असें वाडवडील सांगत आले आहेत. दुसऱ्यानें लाविलेल्या नंदादीपाची वात सारण्याचें श्रेय इतकें आहे आणि हा जो उपदेशरूपी उज्ज्वल ज्ञानदीप स्वत:च लावून ठेवण्यांत आला आहे, त्याची वात सारण्याचें काम माझेंच आहे, हें जाणून मी आज उपलब्ध असलेलीं धर्मपर व्याख्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहें. हीं मजप्रमाणें इतर वाचकांसही कल्याणप्रद व्हावीं, हेंच देवाजवळ अनन्यभावानें मागणें आहे.

ह्यांपैकी पुष्कळ व्याखानें रा. रा. दिनानाथ विष्णु माडगांवकर, बी. ए. व **सुबोधपत्रिके**च्या मराठी बाजूचे संपादक रा. रा. द्वारकानाथ गोविंद वैद्य ह्यांनी लिहून काढिली व **सुबोधपत्रिकें**त प्रसिद्ध केलीं आहेत. त्याचप्रमाणें यांतील कांहीं

व्याख्यानें **सुधारक, मुंबईवैभव** व **ज्ञानप्रकाश** या पत्रांतूनही घेतलीं आहेत, हें येथें सांगितलें पाहिजे.

हा संग्रह करण्याचे व पुस्तक छापवून प्रसिद्ध करण्याचे कामीं रा. द्वा. गो. वैद्य ह्यांचे मला जें साहाय्य मिळालें त्याबद्दल मी त्यांची फार आभारी आहें. रा. रा. वैद्य यांच्या मदतीशिवाय हें काम इतक्या लवकर तडीस गेलें नसतें, इतकें सांगितलें, म्हणजे त्यांनीं आस्थापूर्वक व एकनिष्ठपणें केलेल्या श्रमांची वाचकांस कल्पना होईल.

लोणावळें, ता. २५<br>जान्युआरी सन १९०२ } **रमाबाई रानडे**

----------

## तिसऱ्या आवृत्तीविषयीं दोन शब्द

या तिसऱ्या आवृत्तीला रा. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनी लिहिलेला चरित्रात्मक लेख नवीन जोडला आहे. पूर्वीप्रमाणें रा. वैद्य यांच्याच परिश्रमामुळें ही आवृत्ति लवकर बाहेर पडत आहे.

सेवासदन, पुणें.<br>ता. ८ ऑगष्ट १९२३ } **रमाबाई रानड**

----------

✦✦✦

# उपोध्दात

प्रार्थनासमाजाची स्थापना झाली त्या वेळेस धर्माचीं सहा मूलतत्त्वें कल्पून तीं ज्यास मान्य तो समाजांत प्रविष्ट होण्यास अधिकारी होईल, असा निर्बन्ध करण्यांत आला, परंतु प्रपंचांतील बिकट प्रसंगीं अंत:करणांत चिंता, क्षुब्धता आणि भीति उत्पन्न होतात, त्या निरस्त होऊन त्या धर्माच्यायोगें समाधान, शांति, आणि धैर्य उदित व्हावीं आणि एकंदरींत अंत:करणांत सद्वृत्ति स्थिर होऊन सदाचरणाची प्रवृत्ति व्हावीं, असें स्वरूप त्या धर्मास येण्यास भिन्न भिन्न प्रकारांनी त्या सहा तत्त्वांचा विकास व्हावा ही गोष्ट आवश्यक होती. हा विकास समाजसंबंधाने जे थोडे उपदेशक झाले त्यांनी बऱ्याच अंशी केला आहे. परंतु त्यांनीं दिलेलीं व्याख्यानें समग्र कोणीं लिहून काढलीं नाहींत. कांहींचा सारांश **सुबोधपत्रिका** म्हणून समाजांचे जें साप्ताहिक पत्र आहें त्यांत छापून प्रसिद्ध झाला आहे. त्याशिवाय निबंधही थोडेसे त्या पत्रिकेंत छापले आहेत, आणि स्वतंत्र छापलेले असेही कांही मराठी व इंग्रजी लहानसे ग्रंथ आहेत. परंतु वर्तमानपत्रांत छापलेल्या निबंधास किंवा उपदेशास स्थायिकपणा येत नाहीं, तो पाहिजे त्या वेळीं सांपडत नाहीं आणि सर्वच वाचावयाचे, तर भिन्न भिन्न ठिकाणीं ते असल्यामुळें ती गोष्ट दुष्कर होते. शिवाय वर्तमानपत्राचे सर्व अंक जपून ठेवणारे गृहस्थ फारच थोडे. यास्तव धर्मविकासाचें आजपर्यंत जें उपदेशकांकडून काम झालें तें बहुतेक व्यर्थच गेलें असें म्हणावयाचें. या उपदेशांचा आणि निबंधांचा संग्रह करून स्वतंत्र पुस्तकरूपानें ते जर कोणी छापते, तर असा परिणाम झाला नसता. असा संग्रह करण्यापुरती ह्या कामीं आस्थाच कोणाच्या मनामध्ये उत्पन्न झाली नाहीं. परंतु धर्मसंबंधी आस्थेनें जें काम व्हावयाचें तें अकालीं लोकांतरी गेलेले जे आपले मित्र **रा. ब. माधवराव रानडे** त्यांच्याविषयीं त्यांची पत्नी ''**गुण: पुजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वय:**'' या न्यायानें परिचित वर्गास मान्य अशा **रमाबाई** यांची असीम जी भक्ति तिच्यायोगें आतां होत आहे. रमाबाईंनी लिहिलेली जी प्रस्तावना ती वाचली असतांना त्यांची पतीविषयी परम पूज्यबुद्धि आणि प्रेम आणि तत्पूर्वक त्यांच्या गुणांचे सतत

अनुध्यान अशा रीतीनें सुव्यक्त होतात कीं वाचणाराचें मन सद्गदित झाल्याशिवाय राहात नाहीं. पुष्कळ परिश्रम करून पतीनें केलेले उपदेश तपासून हें पुस्तक त्यांनी तयार केलें आहे, त्यामुळें धर्माची अभिवृद्धि इच्छिणारे जे त्यांच्यावरही या बाईंचे फारच उपकार झाले आहेत.

**रा. ब. रानडे** यांच्या उपदेशामध्यें नेहमीं कांहीं तरी मार्मिक अंश असे, आणि कोणत्या तरी एका तत्त्वाचा विकास केलेला असे. पुण्यामध्यें त्यांचा मुक्काम असतांना त्यांच्या उपदेशांचें मला श्रवण नित्य होई, त्या उपदेशांपैकीं या पुस्तकांत फारसे नाहींत. मुंबईस गेल्यानंतर त्यांनीं केलेल्या उपदेशांचा बहुतकरून संग्रह आहे; तथापि दोन्ही ठिकाणीं झालेल्या उपदेशांची सरणी एकच. एकनाथस्वामींचीं वचनें घेऊन भागवतधर्माचें त्यांनी जें उपपादन केलें त्यांतील सारांश असा आहे कीं, ज्ञानमार्ग आणि योगमार्ग हेच दोन खरे मानिले, तर पुष्कळ साध्या मनुष्यांस उन्नतीची आशा नाही असें होऊं लागेल. कारण कीं, ते मार्ग अत्यंत दुष्कर, एखाददुसऱ्यासच साध्य. केवळ कर्ममार्गाचें अवलंबन केलें असतां जडता प्राप्त होते, अंतरात्मा विकसित होत नाहीं; परंतु भागवतमार्ग सर्वांस साळ्याभोळ्यांस सुद्धां साध्य आणि त्याच्या योगें प्रेमळता, दया, क्षमा इत्यादि गुण अंतरात्म्याच्या ठायीं विकसित होतात. शिवाय हा मार्ग सर्व जातींच्या पुरुषांस आणि स्त्रियांस मोकळा आहे; त्याप्रमाणें वरील तीन नाहींत. म्हणून भागवतमार्ग म्हणजे देवाच्या ठायीं शुद्ध भावानें अनुराग आणि तत्पूर्वक त्याचें भजन आणि पूजन हाच श्रेष्ठमार्ग. शिवाय इतर मार्गांमध्यें केवळ सुख हाच उद्देश असतो. धर्माचें अवलंबन कां करावें याचें उत्तर सुख होईल म्हणून. विषयोपभोगानेंही सुख होतें, मग त्याचा त्याग कां करावा, याचें उत्तर त्यानें सुख अल्प व धर्मानें होणारें मोठें. तेव्हां हें तत्त्व स्वीकारिलें असतां अशी मति होण्याचा संभव असतो कीं, सध्यां डोळ्यांपुढें सुख होत आहे तें टाका आणि ज्याच्याविषयीं आपणांस प्रत्यक्ष ज्ञान नाहीं तें मेल्यावरतीं होईल असा भरंवसा ठेवून धर्माचरणाचे कष्ट सोसा. इतका वेडेपणा कोणीं करावा! तेव्हां डोळ्यांपुढचें सुख तेंच खुशाल भोगावें अशा मतीच्या योगानें धर्मभ्रष्टता होण्याचा संभव आहे. म्हणून धर्मानें साध्य सुख या मताचा परित्याग करून आपल्या स्वभावाचा जो दिव्य अंश त्याचा विकास करणें आणि दया, क्षमा, शांति इत्यादि जी दैवी संपद ती संपादन करणें हें धर्माचें साध्य असेंच घेऊन चालले पाहिजे; आणि हें मत भागवतधर्मामध्यें मुख्य मानिलें आहे. अलीकडील इंग्रजी ग्रंथांमध्यें धर्माचें साध्य Happiness नव्हे, तर Blessedness हें आहे, हेंच मत **रा. ब. माधवरावांनी**

आपल्या व्याख्यानांत विशदपणानें आणिले आहे. तें सर्वांनी लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दुसऱ्या एका व्याख्यानामध्यें साध्य, सिद्ध आणि साधक हा त्रिवर्ग त्यांनी प्रतिपादिला आहे. साध्य म्हणजे कर्ममार्गी, सिद्ध म्हणजे ज्ञानमार्गी व योगमार्गी आणि साधक म्हणजे भक्तिमार्गी आणि त्यांच्याही संबंधानें वरील विचारांचे उपपादन केलें आहे. दुसऱ्या कांही व्याख्यानांमध्ये ''अवघें देखें जन ब्रह्मरूप'' हे तुकोबांचें वचन घेऊन सर्व मनुष्यांमध्यें दिव्य भाग म्हणजे देवाचा अंश जो आहे त्याचेंच अवलोकन आपण करावें हा उपदेश आहे. परंतु आपणांस अशी वाईट खोड लागली आहे कीं, दुसऱ्यांचे दोषच आम्ही पाहतों आणि कधींकधीं बहुतकरून ''पुढिलांचे मना आणि गुणदोष पूज्य आपणांस करावया'' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणें आपली महति व्हावी हा उद्देश गर्भित असतो. हा प्रकार अत्यंत निंद्य, सर्वप्रकारें अधमपणाचा, तेव्हां यापासून आपण नेहमीं फार दूर राहण्याविषयीं सावध असावें. हा विषय **रा. ब. माधवरावजींच्या** उपदेशांमध्यें त्यांच्या नैसर्गिक सौजन्याच्यायोगें वारंवार येत असे तो उपदेश सर्वथा ग्राह्य आहे; परंतु सर्व प्रसंगीं प्रसिद्धपणें पापें करणारे जे आहेत त्यांची आणि सतत पुण्यशील जे त्यांची एक कोटि होऊन पुण्यपापाचा भेद समाजांत नष्ट झाला असा परिणाम होऊं नये याविषयीं सावधानता असली पाहिजे. आपल्या समाजामध्यें पूर्वीपासून चालत आलेले जे धर्मपंथ त्यांतील ग्राह्यांशाचा आपण अवश्य संग्रह करावा असा कटाक्ष ठेवूनही **रा.ब. माधवरावांनी** कांही व्याख्यानें दिलीं होतीं. आणि पुस्तकांतही त्या प्रकारचीं व्याख्यानें आहेत. विचारी पुरुषांस हे मत पूर्णपणें मान्य आहे.

एकंदरीनें पूज्य **रमाबाईंनीं** तयार करून छापविलेले हें पुस्तक सत्यधर्मान्वेषणपर जे त्यांना आणि विशेषत: प्रार्थनासमाजाचे सभासदांना फार उपयोगाचें होईल. कांही व्याख्यानें तुटकशीं दिसतात, याचें कारण बोलत असतांना बोलणाराचे विचार टिपून घेणारा जो त्याला त्या सर्व विषयांचे ग्रहण न झाल्यामुळें, किंवा विस्मरण झाल्यामुळें ती तशा प्रकारचीं झालीं. शिवाय पुस्तक सांवत्सरिक तिथीच्या दिवशीं प्रसिद्ध करावें हा उद्देश होता, म्हणून घाई करावी लागली.

पुणें,संगमाश्रम,

ता. २८/०१/१९०२ **रामकृष्ण गोपाळ भांडारकर**

✦✦✦

# न्या. मू. रानडे यांच्या शिकवणीचें स्वरूप

पुढील पुस्तकांत संग्रह केलेलीं व्याख्यानें १८८२ ते १९०० या प्रमाणें १८ वर्षांच्या कालावधींतील असून तीं पुणें, मुंबई, नगर, सातारा अशा अनेक शहरांतून झालेलीं आहेत. प्रार्थनासमाजांतील समारंभाच्या निमित्तानेंच केवळ तीं झालेलीं नसून स्वतंत्र रीतीनें प्रार्थनासमाजाबाहेरहि झालेली आहेत. कै. राजारामशास्त्री भागवतांनी आपल्या शाळेंतील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक सत्पुरुषांची चरित्रें व मतें कळावीं म्हणून सुरू केलेल्या व्याख्यानमालेत कै. रानडे यांनी कांहीं व्याख्याने गुंफलीं ह्या गोष्टीकडे लक्ष दिल्यास वरील विधानांची सत्यता सहज पटेल. हीं व्याख्यानें न्यायमूर्तींच्या तोंडून जशीं बाहेर पडलीं तशींच लोकांना सादर करण्याचा यत्न व्याख्यानांचे अहवाल देणारांनीं केलेला आहे. तरीसुद्धा त्यांची भाषा ही सर्वथैव न्यायमूर्तींची नव्हे, हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. चौकशी केल्यास असें आढळतें कीं, येथें प्रकाशित होणाऱ्या व्याख्यानांचे अहवाल सहासात जणांच्या हातचे असून त्यांतील फार मोठी संख्या श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनी लिहून काढलेल्या अहवालांची आहे. लेखक अनेक म्हणून भाषापद्धतीचें विविधत्व भासलें तरी रानड्यांचे विचार ह्या अहवालांतून शक्यतोंवर मुळाबरहुकूम राखण्याची काळजी लेखकांनीं घेतली होती. मुंबईतील कांहीं व्याख्यानांचा गोषवारा प्रसिद्धीपूर्वी रानड्यांच्या नजरेखालून गेला होता; त्यामुळे त्यांतील विचारांची विश्वसनीयता संशयातीत ठरते. पुस्तकाच्या शेवटीं शेवटीं कांही व्याख्यानें मूळ इंग्रजींतून मराठींत उतरलेलीं असून त्यांचें भाषान्तर रानड्यांनीं तपासल्याची माहिती सांपडते. या व्याख्यानांतील शिकवणीची माहिती येथें जोडलेल्या श्री. वैद्यांच्या लेखांत आहेच, पण अभ्यासूंच्या सोयीसाठीं ह्याचा थोडा निराळा विचार केला आहे.

व्याख्यांनाच्या विषयाची वर्गवारी केल्यास भागवत धर्म, प्रार्थनासमाज, अर्वाचीन व ऐतिहासिक कालांतील महापुरुष, देशांतील कित्येक चळवळी आणि गीता, उपनिषदें, संतवचनें यांतून सांपडणारें तत्त्वज्ञान असे प्रस्तुत व्याख्यानांचे कांही ठळक वर्ग पडणे शक्य आहे. न्या. मू. रानडे यांचे केवळ प्रार्थनासमाजाच्या